वर्ष-०७ | अंक-२८ | मुंबई, मंगळवार ०१ ते ०७ जून २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक ●कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक

PG 2
तरुणीने लग्नाला नकार दिला, मित्राच्या मदतीने पुण्याहून नगरले आणले अन्....

3 → दारूच्या अड्ड्यावर धाड टाकायला गेलेल्या पोलिसांवर जमावाचा प्राणघातक हल्ला

अशीच गर्दी राहिली तर पुन्हा कठोर निर्बंध ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## थोडक्यात

### पोलिस बनून लोकांना लुटणारा अखेर गजांआड

पोलिस बनून लुटणाऱ्याला माणिकपूर पोलिसांनी गजांआड केले आहे. रतन टाटा यांच्याशी घनिष्ट संबंध असल्याचा दावादेखील या व्यक्तीतर्फे करण्यात येत होता. यावरून त्याने एका महिलेची फसवणूक केलाच



आरोप होता. या महिलेच्या तक्रारीवरून माणिकपूर पोलिसांनी सदर व्यक्तीस अटक केली आहे. पोरस विराफ जोखी असे या व्यक्तीचे नाव असून वसई पश्चिम सनसिटी परिसरात हा राहतो. पोरस याची स्वतःची टूर्स अँड ट्रॅव्हल्स ची गाडी असून तो सध्या ट्रॅव्हल्सचा व्यवसाय करीत होता. तसेच

...पान २ वर...

## Lockdown

# ....तर निर्बंध आणखी कडक करणार; उद्धव ठाकरेंचा इशारा

### लॉकडाउनचे निर्बंध 15 जूनपर्यंत कायम राहणार असल्याची घोषणा केल्यानंतर मुख्यमंत्र्यांचा कडक निर्बंधांचा इशारा



लॉकडाउनचे निर्बंध १५ जूनपर्यंत कायम राहणार असल्याची घोषणा केल्यानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मुंबईत होणारी गर्दी पाहून आश्चर्य व्यक्त केलं आहे. इतकंच नाही तर मुंबईत अशीच गर्दी होत राहिली तर आणखी कडक निर्बंध करणार असल्याचा इशाराच उद्धव ठाकरेंनी दिला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या मल्टीप्लीस्टिज पुस्तकाच्या प्रकाशनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

"आज रस्त्यावरचं ट्राफिक बघून मी आश्चर्यचकित झालो. मी काल नेमकं काय बोललो अशी एकदा चौकशीही केली. मी चुकून सगळी बंधनं उठवली असं तर म्हणालो नव्हतो ना याबद्दल दोघा तिघांना विचारलं. मुंबई किंवा महाराष्ट्रात आपण बंधनं उठवलेली नाहीत. अजूनही करोनाचा धोका संपलेला नाही. जर का आपण गाफील झालो तर संथगतीने सुरु होणाऱ्या आयुष्याला पुन्हा ब्रेक लागेल. मुंबईत पुन्हा अशीच गर्दी होत राहिली तर निर्बंध कठोर करावे लागतील," असा इशारा उद्धव ठाकरेंनी दिला आहे.

मुंबईतील मेट्रोच्या २ ए आणि ७ या दोन मार्गिकांचं सोमवारी उद्घाटन झालं. यासंबंधी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, "निर्बंध जेव्हा उठतील तेव्हा अधिक जोमाने, कित्येक पटीने आपलं आयुष्य गतीमान होण्यासाठी म्हणून ही कामं आहेत".

करोनाची दुसरी लाट ओसरत असली तरी रुग्णसंख्या हवी तशी कमी न झाल्याने लॉकडाउनचे निर्बंध १५ जूनपर्यंत कायम ठेवण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी केली. मात्र, रुग्णसंख्या कमी असलेल्या ठिकाणी निर्बंध शिथिल करण्याचे अधिकार स्थानिक प्रशासनाला देण्यात आले आहेत. त्यानुसार कमी रुग्णसंख्या असलेली शहरे आणि जिल्ह्यांमध्ये अत्यावश्यक सेवेतील दुकाने सकाळी ७ ते दुपारी २ वाजेपर्यंत खुली राहू शकतील. अत्यावश्यक सेवा वगळता अन्य दुकाने उघडी ठेवण्यास मुभा देण्याचा निर्णय आता मोठ्या शहरांमध्ये महानगरपालिका आयुक्त वा जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी घेऊ शकतील. दुकाने उघडण्यास परवानगी देण्याचे अधिकार सरकारने स्थानिक पातळीवर दिले आहेत.

रुग्णसंख्येनुसार दोन विभाग करण्यात आले आहेत. 'अ' श्रेणीत करोना चाचणीत १० टक्के किं वा त्यापेक्षा ...पान २ वर...

### कोणत्या दुकानांना परवानगी मिळणार?

केशकर्तनालये, संगणक, पावसाळी वस्तू , कपडे आदी दुकाने उघडण्यास परवानगी मिळणार का, याची नागरिकांना अधिक उत्सुकता आहे. कमी रुग्णसंख्या असलेल्या शहरे किंवा जिल्ह्यांमध्ये स्थानिक प्रशासन याबाबतचा निर्णय घेऊ शकते. कोणती आणि कशा पद्धतीने दुकाने उघडण्यास परवानगी द्यायची याचा निर्णय स्थानिक पातळीवरच होईल. केंद्र सरकारला पत्र पाठवण्याची, प्रत्यक्ष बोलण्याची तयारी आहे, असेही ठाकरे यांनी रविवारी राज्यातील जनतेला उद्देशून केलेल्या भाषणात सांगितले.

### मुंबई, ठाण्यासह दहा शहरांना अधिक सवलती?

**मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार, नागपूर, औरंगाबाद आणि नाशिक या दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या महानगरांची स्वतंत्र प्रशासकीय घटक म्हणून गणना के ली जाईल. या शहरांव्यतिरिक्त जिल्ह्याच्या अन्य भागासाठी स्वतंत्र घटक असेल. मोठ्या शहरांमध्ये अधिक निर्बंध शिथिल करता यावेत या दृष्टीनेच हे नियोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.**

# ओस्तवाल बिल्डर कडून लोकांची फसवणूक

### बोगस नकाशाच्या आधारे 400 फ्लॅट्स, गाळे विकले




भाईंदर, नामचीन बिल्डर उमराब सिंग ओस्तवाल हा 'चारसोबीस' निघाला आहे. बोगस नकाशे दाखवून त्याने आतापर्यंत तब्बल ४०० फ्लॅटस तसेच गाळे विकले असून कोट्यबधी रुपयांची माया जमा केली आहे. निशेष म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांच्या खोट्या सह्या आणि शिक्क्यांचाही त्याने वापर केला आहे. या 'मस्तबाल' ओस्तबाल बिल्डरविरोधात नबघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून त्याचे आणखी काही कारनामे उघडकीस येण्याची शक्यता आहे. तसेच या गोरखधंद्यात सामील असणाऱ्या अधिकाऱ्यांचाही शोध पोलिसांनी सुरू केला आहे. भाईंदर पूर्वेकडील जेसल पार्क परिसरात अतिक्रमण करून सात मजली 'ओस्तवाल ऑरनेट' इमारत बांधण्यात आली. मूळ बांधकाम नकाशात बदल केले. तसेच शासकीय अधिकाऱ्यांचे सही व शिक्के मारून ४०० च्या आसपास फ्लॅट, गाळे गरजूंना विकले. सदर प्रकरणी त्या इमारतीमधील गाळेधारक शिजॉय मॅथ्यू यांनी तत्कालीन आयुक्त बालाजी खतगावकर यांच्यासह डॉ. विजय राठोड यांच्याकडे पुराव्यानिशी लेखी तक्रारी दाखल केल्या होत्या. मात्र या तक्रारीवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

#### अजून अटक नाही

बिल्डर ओस्तवाल याला मदत करणारा संबंधित अधिकारी व सदर इमारतीला भोगबटा दाखला मिळविण्यासाठी तब्बल चार वेळा अर्ज करणाऱ्या सल्लागार अभियंत्याचीही कसून चौकशी होण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास अनेक कारनामे उघड होतील, तर अजूनपर्यंत ओस्तवाल बिल्डर याला अटक करण्यात आले नाही. फक्त चौकशी सुरू असल्याचे तपास अधिकारी गणेश केकान यांनी सांगितले.

# करोना सवलतीमुळे गुन्हेगारीत वाढ?

मुंबई : कठोर निंबधाच्या काळात शहरातील गुन्हे वाढले असून हत्येचा प्रयत्न, बलात्कार अशा गंभीर गुन्ह्यांपासून वाहनचोरी, घरफोडी, दरोडय़ाच्या गुन्ह्यांमध्ये मोठय़ा प्रमाणात वाढ झाल्याचे मुंबईतील पोलीस ठाण्यांमधील नोंदींवरून स्पष्ट होते. करोना संसर्गाच्या पार्श्वभूमी वर कारागृहांतील गर्दी कमी करण्यासाठी आरोपींना तात्पुरत्या जामिनाची मुभा देणे, हे त्यामागील प्रमुख कारण असल्याचे निदर्शनास आले आहे, असे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. करोना संसर्गाची पहिली लाट थोपविण्यासाठी टाळेबंदी

> करोना संसर्गाची पहिली लाट थोपविण्यासाठी टाळेबंदी लादण्यात आली. या काळात विनाकारण घराबाहेर पडणे अशक्य होते. नागरिक आपापल्या घरातच होते.

लादण्यात आली. या काळात विनाकारण घराबाहेर पडणे अशक्य होते. नागरिक आपापल्या घरातच होते. रेल्वे स्थानके , ठरावीक दुकाने सोडल्यास बाजारपेठा ओस पडल्या होत्या. त्यामुळे गुन्ह्यांचा आलेख उतरला. मात्र पहिली लाट ओसरल्यावर हा आलेख पुन्हा चढू लागला. दुसरी लाट थोपविण्यासाठी कठोर निर्बंध जारी करण्यात आल्यावरही हा आलेख चढाच राहिला.


मुंबई पोलिसांच्या संके तस्थळावर दिलेल्या आकडेवारीनुसार, दंगल, विनयभंग, सोनसाखळी चोरी सोडल्यास हत्या, हत्येचा प्रयत्न, बलात्कार, दरोडा, जबरी चोरी, घरफोडी, चोरी, खंडणी, वाहन चोरी, हाणामारी आदी गुन्ह्यांमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढ झाली आहे. गेल्या वर्षी मार्च



महिन्यापासून टाळेबंदी सुरू झाली. यावर्षी एप्रिल महिन्यापासून कठोर निर्बंध लागू झाले. दोन्ही वर्षांमध्ये जानेवारी ते मार्च हा काळ साधारण सारखाच होता. करोना संसर्ग कारागृहात पसरू नये या उद्देशाने गृहविभागाने उच्चाधिकार ...पान २ वर...

# दहावीच्या मूल्यमापनापूर्वीच अकरावीच्या शिकवण्या सुरू

मुंबई : राज्यातील दहावीच्या विद्यार्थ्यांचा प्रश्न अद्यापही पूर्णपणे सुटलेला नसताना मुंबई आणि उपनगरांतील खासगी शिकवण्यांनी मात्र अकरावीचे वर्ग सुरू केले आहेत. महाविद्यालयांशी संधान बांधलेल्या शिकवणी वर्गामध्येही विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले



आहेत. दहावीची परीक्षा रद्द केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाचा आराखडा शिक्षण विभागाने जाहीर केला. अकरावीसाठी ऐच्छिक प्रवेश परीक्षा घेण्याचेही जाहीर केले. मात्र, त्याबाबत अद्यापही संभ्रम दूर झालेले नाहीत.

# 49 वर्षांच्या संसारानंतर पत्नीला सोडचिट्ठी



गोरेगाव : म्हातारपणी पती-पत्नी हे एकमेकांसाठी मोठा आधार असतात. जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत एकमेकांना साथ देण्याची त्यांची इच्छा असते. गोरेगावमध्ये मात्र जवळपास ४९ वर्षे सुखाने संसार केल्यानंतर एका ७१ वर्षीय व्यक्तीने क्षुल्लक कारणावरून आपल्या पत्नीला तिहेरी तलाक देण्याचा प्रकार घडला आहे. ...पान २ वर...

# नोकरीच्या आशेने भारतात आलेली बांगलादेशी महिला देहविक्रय व्यवसायात अडकली अन..

मुंबई, करोनामुळे रोजगार बुडाल्यानंतर जास्त वेतनाच्या नोकरीच्या आशेपोटी भारतात चोरमार्गाने आलेल्या एका बांगलादेशी महिलेस देहविक्रय करण्यास भाग पाडण्यात आले. मात्र बांगलादेश पोलिस व येथील पोलिसांनी तिची सुटका केली. बांग्लादेशच्या सीमेवरील गावात राहणारी रेहाना (बदललेले नाव) एका तागाच्या गिरणीत नोकरीला होती. लॉकडाउनमुळे गेल्या वर्षी तिची नोकरी गेली. नवीन नोकरीच्या शोधात असताना एका महिलेने तिला भारतामध्ये ब्युटी पार्लरमध्ये नोकरी मिळत असून चांगले वेतनही मिळेल असे सांगितले. सुरुवातीला नकार देणारी रेहाना कुटुंबाची उपासमार पाहून भारतात येण्यास तयार झाली. त्या महिलेने ओळख करून दिलेल्या



परिचयातील व्यक्तींसोबत ती होडीतून नदी पार करून कोलकाता येथे आली. तिथून तिला मुंबईत आणण्यात आले आणि मुंबईहून हैदराबाद येथे नेण्यात आले. २ दिवस एका खोलीत ठेवल्यानंतर तिसऱ्या दिवशी एका ग्राहकाला तिच्याकडे पाठविण्यात आले. हा सर्व प्रकार पाहून घाबरलेल्या रेहानाने तिथून पळ काढला. हैदराबादच्या रस्त्यावर फिरत असताना एका पादचाऱ्याने तिला पैशांची मदत केली आणि ती मुंबईत आली. दरम्यान, काहीतरी शंका आल्याने रेहानाच्या पतीने तेथील दिगोलिया पोलिस ठाण्यात तक्रार केली. दिघोलिया पोलिसांनी याबाबत कोलकाता पोलिसांना कळविले. कोलकाता पोलिसांनी रेहानाच्या सुटकेसाठी एका स्वयंसेवी संस्थेची मदत घेतली. या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी एका बांगलादेशी व्यक्तीच्या घरी आसरा घेऊन राहाणाऱ्या रेहानाला शोधून काढले. नागपाडा पोलिसांनी रेहानाचा जबाब नोंदवून घेतला. तसेच, महिलांची खरेदी-विक्री करणाऱ्या टोळीविरोधात गुन्हा दाखल केला.

# दुर्गाडी खाडीवरील नवीन पुलाच्या दोन मार्गिका खुल्या

कल्याण : गेल्या दोन वर्षांपासून दुर्गाडी पूल आणि दुर्गाडी चौकात अभूतपूर्व वाहनकोंडी होत आहे. या रस्त्याला दुसरा पर्याय नसल्याने या वाहन कोंडी आणि गर्दीत शिरून वाहनचालकांना दुर्गाडी पुलावरून मोठ्या प्रयासाने भिवंडी बावळण रस्त्याकडे जावे लागत होते. मात्र दुगार्डी खाडीवरील नवीन पुलाच्या सहापैकी दोन मार्गिकांचे उद्घाटन सोमवारी करण्यात आल्याने आता ही कोंडी फुटली आहे.

> दुर्गाडी पुलावरून बदलापूर, अंबरनाथ, मुरबाड, कल्याण, टिटवाळा भागातील वाहनांची ये-जा सुरु असते.



दुर्गाडी पुलावरून बदलापूर, अंबरनाथ, मुरबाड, कल्याण, टिटवाळा भागातील वाहनांची ये-जा सुरू असते. २० वर्षांपूर्वी खाडीवरील एक पूल धोकादायक झाला. त्यामुळे तो वाहतुकीसाठी बंद करून दुसरा नवीन पूल उभारण्यात आला. तोही वाहनांना कमी पडू लागला. खाडीवरून भिवंडीच्या दिशेने जाण्यासाठी एकाच पुलाचा वापर करावा लागत असल्याने वाहनचालकांना एक ते दीड तास दुर्गाडी चौकात अडकून पडावे लागत होते. दोन वर्षांपासून नोकरदारांचे सर्वाधिक हाल या कोंडीमुळे झाले. ही कोंडी सोडविण्यासाठी पाच वर्षांपूर्वी दुर्गाडी पुलावर सहा मार्गिकेचा नवीन उड्डाणपूल उभारणीचा निर्णय घेण्यात आला. जुलै २०१६ मध्ये या पुलाचे भूमिपूजन करण्यात आले. मार्च २०१८ मध्ये या पुलाचे काम पूर्ण करण्याची मर्यादा होती. या पुलाच्या सहा मार्गिकांपैकृ दोन मार्गिका सुसज्ज केल्या. पावसाळ्यात नोकरदार वर्गाचे हाल विचारात घेऊन तयार झालेल्या दोन मार्गिका वाहनांसाठी खुल्या कराव्यात यावर वाहतूक विभाग, पालिका अधिकारी ...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र
मुंबई
२
मुंबई, मंगळवार ०१ ते ०७ जून २०२१

## तरुणीने लग्नाला नकार दिला, मित्राच्या मदतीने पुण्याहून नगरले आणले अन्....



नगरः एकतर्फी प्रेमातून पुण्यात एका कंपनीत नोकरीला असलेल्या तरूणीचे अपहरण करून तिला नगरला आणले. येथे एका ठिकाणी तिला डांबून ठेवले. तरीही लग्नाला नकार देत असल्याने तिचा डांबून ठेवलेल्या अवस्थेतील फोटो आईला पाठविला. शेवटी पोलिस आले आणि तिची सुटका केली. या प्रकरणी समीर शेख अब्दुल समद यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विदर्भातील अकोला जिल्ह्यातील ही युवती पुण्यातील एका आयटी कंपनीत नोकरीला आहे. तिचा नगर येथील मित्र समीर शेख तिच्यावर एकतर्फी प्रेम करीत होता. तिने लग्न करावे म्हणून तिच्याकडे अग्रह धरीत होता. मात्र, ती तरुणी त्याला नकार देत होती. यासंबंधी त्याने तिच्या आईशीही बोलणे केले होते. तरुणीने नगरला येऊन लग्न करावे, असे तो सांगत होता. मात्र, तिने नकार दिल्याने २९ मे रोजी त्याने त्याच्या तीन मित्रांच्या मदतीने तरुणीला पुण्याहून नगरला आणले. तरीही ती लग्नाला नकार देत होती. त्यामुळे तिला त्रास दिला. लालटाकी भागात एका ठिकाणी तीन दिवस डांबून ठेवले. तिचा फोटो काढून तिच्या आईला पाठविला. तरुणीने तिच्या आईशी संपर्क साधला. मी अडचणीत आहे, एवढेच तिला बोलू दिले. त्यानंतर आरोपींनी तिच्याकडून मोबाईल काढून घेतला. आपल्या मुलीसोबत गंभीर प्रकार घडल्याचे आईला समजले. त्यामुळे त्यांनी नगरला येऊन तोफखाना पोलिसांकडे शेख याच्याविरूद्ध तक्रार दिली. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला. तातडीने तपास सुरू केला. आरोपी शेख याला पकडण्यात आले. तरुणीला डांबून ठेवलेल्या ठिकाणी जाऊन तिची सुटका करण्यात आली. सुमारे तीन दिवसांनंतर तिची सुटका झाली. त्यानंतर तिने सर्व हकिगत आई आणि पोलिसांना सांगितली. तिला तिच्या आईच्या ताब्यात देण्यात आले. दोघांच्याही पालकांना बोलावून घेण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान सोळके तपास करीत आहेत. आरोपी शेख याला मदत करणाऱ्यांविरूद्धही गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## मुंबईकरांचा प्रवास होणार सुकर; मेट्रोच्या चाचणीला मुख्यमंत्र्यांकडून हिरवा झेंडा



मुंबईः मेट्रो प्रवासाचा दुसरा टप्पा अखेर सुरु होण्याच्या मार्गावर आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) आजपासून डहाणूकरवाडी ते आरे मेट्रो स्टेशनदरम्यान चाचणी सुरू झाली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या उपस्थित हा सोहळा पार पडला आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत मेट्रो चाचणीला हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यावेळी आकुर्ली स्थानकात खास आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर, छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (सीएसएमआयए) च्या टर्मिनल १ (टी १) आणि टर्मिनल २ (टी २) ला पोहोचण्यासाठी एमएमआरडीएकडून भुयारी आणि उन्नत मार्ग प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले आहे. २४ महिन्यात हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

डहाणूकरवाडी ते आरे मेट्रो स्टेशनदरम्यान आगामी चार महिने ही चाचणी प्रक्रिया विविध टप्प्यांत पार पडणार आहे. एकूण २० किलोमीटरच्या मार्गावर या चाचण्या सुरू होतील.

मेट्रो २ अ (दहिसर पूर्व ते डी.एन.नगर) आणि मेट्रो ७ (अंधेरी पूर्व ते दहिसर पूर्व) या मार्गावरील मेट्रो दोन टप्प्यात धावणार आहे. ऑक्टोबरमध्ये पहिला टप्पा प्रवाशांसाठी खुला करण्यात येणार असून दुसरा टप्पा जानेवारी २०२२ पर्यंत सुरू होईल.

करोनासंकटात मनुष्यबळाच्या अनुपलब्धतेपासून, कडक निर्बंधांचा परिणाम मेट्रो कामांवर होत होता.

मात्र सर्व अडथळ्यांवर मात करून मेट्रो कामे वेगाने पूर्ण करण्यात आली. यामुळे पूर्व नियोजनानुसार मेट्रो चाचणी पार पडत असल्याचे एमएमआरडीएतील अधिकाऱ्यांनी सांगितले. मेट्रो २ अ आणि मेट्रो ७ मार्गांवर वातानुकूलित चालकविरहीत मेट्रो धावेल.

मात्र मुंबईकरांना सवय व्हावी यासाठी मोटरमनची नियुक्ती या मेट्रोमध्ये करण्यात येणार आहे. सध्या एक गाडी ताफ्यात असून आणखी दहा गाड्या ऑक्टोबरआधी दाखल होतील, असंही सांगण्यात येत आहे.

## दख्खनची राणी होणार ९२ वर्षांची




पुणे-मुंबईदरम्यान दररोज रेल्वेने ये-जा करणाऱ्या चाकरमान्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग असलेली दख्खनची राणी (डेक्कन क्वीन) उद्या, मंगळवारी (१ जून) ९२ व्या वर्षात पदार्पण करणार आहे. करोनामुळे यंदाही डेक्कन क्वीन मुंबईतील यार्डातच असली, तरीही वाढदिवसाची परंपरा खंडित होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. रेल्वे प्रवासी ग्रुपच्या वतीने पुणे रेल्वे स्थानक येथे उद्या, एक जूनला वाढदिवस साजरा केला जाणार आहे. पुणे-मुंबई शहराला जोडण्यासाठी एक जून १९३० रोजी डेक्कन क्वीनची सेवा सुरू करण्यात आली. त्याला आता ९१ वर्षे पूर्ण झाली आहे. ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वे कंपनीने पहिली 'लक्झरिअस सेवा' म्हणून पुणे-मुंबई मार्गावर डेक्कन क्वीनची सेवा सुरू केली होती. महाराजा एक्स्प्रेस, डेक्कन ओडिसी, 'पॅलेस ऑन व्हील्स' यांसारख्या महागड्या गाड्यांमध्ये असलेल्या अनोख्या 'डायनिंग कार'चा डेक्कन क्वीनमध्ये समावेश आहे. त्यामुळे डेक्कन क्वीनला इतर इंटरसिटी गाड्यांपेक्षा वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे.

दर वर्षी एक जूनला ही गाडी मुंबईला रवाना होण्यापूर्वी रेल्वे प्रवासी ग्रुप आणि पुणे ते मुंबई या दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून मोठ्या थाटात केक कापून वाढदिवस साजरा केला जातो. नेहमीचे प्रवासी गाडीची अंतर्बाह्य सजावट करतात. गेल्या वर्षी लॉकडाउनमुळे रेल्वेची सेवा बंद होती. त्यामुळे पुणे रेल्वे स्थानकात प्रतिकात्मक वाढदिवस साजरा केला होता.

## मराठा समाजाला दिलासा, आरक्षणासंदर्भात ठाकरे सरकारचा मोठा निर्णय



मुंबई : मराठा आरक्षण सुप्रीम कोर्टात रद्द झाल्यानंतर आता मराठा समाजाला दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी नोकरीमध्ये आर्थिक दुर्बल घटकांच्या १० टक्के आरक्षणाचा लाभ आता घेणार आहे. सुप्रीम कोर्टामध्ये आरक्षण रद्द झाल्यानंतर राज्य सरकारकडून हा मार्ग काढण्यात आल्याचं बोललं जात आहे. राज्य सरकारने दिलेल्या माहितीनुसार, मराठा विद्यार्थी आणि उमेदवारांना शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशात 10% आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्ग (EWC) आरक्षणाचा लाभ घेता येणार आहे. यासंबंधी सरकारकडून जीआरदेखील जारी करण्यात आला आहे. मराठा आरक्षण रद्द झाल्यानंतर मराठा समाज आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे.

## ठाण्यात लाचखोरीच्या प्रकरणांमध्ये वाढ

ठाणे, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या ठाणे परिक्षेत्रात जानेवारी ते मे या पाच महिन्यांमध्ये लाचखोरीशी संबंधित एकूण ३० गुन्हे दाखल झाले असून भ्रष्टाचाराचे अन्य एक प्रकरणही आहे. याच कालावधीत मागील वर्षी २२ गुन्ह्यांची नोंद झाली होती, तर अपसंपदेचा एक गुन्हा दाखल होता. यंदा लाचखोरीच्या गुन्ह्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे, रत्नागिरीमध्ये गेल्या वर्षी आणि यंदाही आतापर्यंत एकही लाचखोरीचे प्रकरण समोर आलेले नाही. त्यामुळे येथील प्रकरणांची संख्या शून्य आहे.

चालू वर्षात १ जानेवारी ते आतापर्यंत लाचखोरीची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. यामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांसह अनेक कर्मचारीही लाच घेताना पकडले गेले असून लाचखोरीच्या काही प्रकरणांमुळे खळबळ उडाली होती. ठाणे महापालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजू मुरुडकर यांना लाच घेताना झालेली अटक, हे त्यातीलच एक प्रकरण. अधूनमधून लाचखोर एसीबीच्या सापळ्यात अडकत असून अन्य भ्रष्टाचाराचीदेखील प्रकरणे समोर आलेली आहेत. बीओटी तत्त्वावर टीएमटीचे ४७० बसथांबे उभारून त्यावर जाहिरात प्रसिद्ध करण्याचे हक्क देण्याच्या कंत्राटामध्ये ठाणे महापालिकेचे सहा कोटींहून अधिक रुपयांचे आर्थिक नुकसान झाले. या प्रकरणी एसीबीने टीएमटीच्या आजी, माजी अधिकाऱ्यांसह कंत्राटदारावर गुन्हा दाखल केला होता. अशा प्रकारे पाच आणि सिंधुदुर्गमधील तीन प्रकरणे असून ठाण्यात भ्रष्टाचाराचा एक गुन्हा दाखल झाला आहे. तर, रत्नागिरीमध्ये एकाही गुन्ह्यांची नोंद झालेली नाही. याच कालावधीत गेल्या वर्षी लाचखोरीच्या गुन्ह्यांची संख्या २२ आणि एक अपसंपदेचा गुन्हा दाखल झाला होता. विशेष म्हणजे, त्या कालावधीमध्ये



एसीबीच्या ठाणे परिक्षेत्रात गेल्या पाच महिन्यांत लाचखोरीप्रकरणी ३० गुन्हे दाखल झालेले आहेत. यामध्ये आरोपींची संख्या ४३ आहे. अन्य एका भ्रष्टाचाराच्या गुन्ह्यामध्ये १० आरोपी आहेत. ३० गुन्ह्यांपैकी ठाण्यातील लाचखोरीच्या प्रकरणांची संख्या १३ आहे. पालघर पाच नवी मुंबई चार, रायगड रत्नागिरीमध्ये एकाही गुन्ह्यांची नोंद झाली नाही. या आकडेवारीवरून यंदा गुन्ह्यांच्या संख्येमध्ये आठने वाढ झाल्याचे दिसत आहे. प्रत्येक ठिकाणी सापळ्यांच्या संख्येमध्ये वाढ झाल्याचे चित्र असून ठाणे जिल्ह्यात लाचखोरीच्या गुन्ह्यांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते.

## ऑर्केस्ट्रा बारमध्ये पोलिसांचा छापा, 23 जुगाऱ्यांसह 23 लाखांचा मुद्देमाल जप्त



सोलापूर : राज्यात करोनाचा धोका टाळण्यासाठी कडक लॉकडाऊन केलं असलं तरी जुगारी अड्डे काही थांबण्याचं नाव घेत नाही. आताही सोलापूर शहर पोलीस आयुक्तालय गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ऑर्केस्ट्रा बारमध्ये चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून एकूण २३ आरोपींसह २३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विजापूर रोडवरील नागेश ऑर्केस्ट्रा बार इथं जुगार अड्डा सुरू असल्याची माहिती एपीआय शितलकुमार कोल्हाळ यांना मिळाली होती. त्या महितीच्या आधारे, शहर गुन्हे शाखेच्या पथकाने सदर ऑर्केस्ट्रा बारवर छापा टाकला असता, त्या ठिकाणी २३ जुगारी जुगार खेळत असताना आढळून आले. त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर महाराष्ट्र जुगार कायदा ४, ५ सह भारतीय दंड विधान संहिता १८८ आणि साथीचे रोग नियंत्रण कायदा कलम ३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, या छाप्यात जुगाऱ्यांकडून मोबाईल, वाहने असा २३ लाख ९ हजार ४९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या बातमीमुळे शहरात खळबळ उडाली असून पोलीस यंत्रणा आणखी ठिकाणी छापे मारून अधिक तपास करत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## दुर्गंध आला म्हणून शेजाऱ्यांनी उघडलं दार, घरात महिलेला पाहून बसला धक्का



गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यात महिला हत्येचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आल्लापल्ली इथं प्रभाग क्र. 2 मधील भेदके वाडा वस्तीत एका महिलेची हत्या झाल्याची घटना उघडकीस आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली असून पोलीस तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सदर हत्या काल दुपारी 12 ते 3 च्या दरम्यान झाली असावी असा अंदाज घरमालकाने दिलेल्या माहितीच्या आधारवर व्यक्त केला जात आहे. इतकंच नाहीतर, पत्नीची हत्या करून पती पळून गेला असा संशय व्यक्त केला जात आहे.

मृतक महिलेचे नाव सुशिला गोपीचंद मडावी वय 43 असं आहे. सुशिला या भामरागड तालुक्यातील कोठी इथल्या असून त्या मागील दोन महिन्यांपासून आपल्या पती सोबत आल्लापल्लीत वास्तव्यास राहत आहेत.

## पृष्ठ १ वरुन

### तर निर्बंध आणखी कडक

कमी करोनाबाधितांचे प्रमाण आणि प्राणवायूयुक्त खाटा ४० टक्यांपेक्षा कमी भरलेल्या असल्यास निर्बंध शिथिल के ले जातील. अशी शहरे आणि जिल्ह्यांमध्ये दुकाने सकाळी ७ ते दुपारी २ पर्यंत खुली राहतील. अन्य दुकाने उघडण्याचा निर्णय स्थानिक प्रशासनाकडून घेतला जाईल. मात्र एकल दुकाने उघडी ठेवण्यास परवानगी दिली जाईल. मॉल्स किं वा व्यापारी संकु ले उघडण्यास परवानगी नसेल. अत्यावश्यक सेवेप्रमाणेच अन्य दुकानेही दुपारी २ पर्यंतच उघडी ठेवता येतील. तसेच अत्यावश्यक सेवेतील वगळता अन्य दुकाने शनिवारी आणि रविवारी दोन दिवस बंद राहतील.

चाचणीत करोनाबाधितांचे प्रमाण २० टक्के किं वा त्यापेक्षा जास्त असलेल्या जिल्ह्यांमध्ये कडक निर्बंध लागू असतील. अशा जिल्ह्यांच्या सीमा बंद केल्या जातील. जेणेकरून या जिल्ह्यातून लोक बाहेर जाणार नाहीत वा अन्य जिल्ह्यातील नागरिका जास्त रुग्णसंख्या असलेल्या जिल्ह्यांमध्ये येणार नाहीत. शेतीचा हंगाम असल्याने दुपारी २ पर्यंत खते, बि-बियाणे, अवजारे आदींची दुकाने उघडी ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. स्थानिक प्रशासनाला वेळेबाबत निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

### पोलिस बनून लोकांना लुटणारा

गोरेगाव येथे राहणाऱ्या एका त्याच्या मैत्रिणीशी त्याचे गेल्या काही वर्षांपासून आर्थिक संबंध होते. दागिने देवाणघेवाण करून त्याच्या मोबदल्यात पैशाचा व्यवहार त्यांच्यात चालायचा. २०१७ मध्ये असेच काही दागिने या मैत्रिणीने पोरस याला दिले होते. मात्र चार वर्षे उलटूनही हे दागिने त्याने परत न केल्याचा आरोप त्याच्या मैत्रिणीने केला आहे. तसेच आपण पालघर पोलिसांत कार्यरत असल्याचे ओळखपत्र आणि उद्योगपती रत्न टाटा यांच्याशी जवळचे संबंध असल्याचे पोरस याने दर्शविले होते. त्यामुळे त्यावर विश्वास असल्याने हा आर्थिक व्यवहार करण्यात येत असल्याची फिर्याद सदर मैत्रणीने माणिकपूर पोलिसांत दिली. तिच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करत पोरस याला माणिकपूर पोलिसांनी तात्काळ अटक केली आहे. मात्र, तपासामध्ये कोणत्याही प्रकारचे पोलिसांचे ओळखपत्र मिळाले नाही. तसेच पोरस याचे वडील रतन टाटा यांच्याकडे ड्रायव्हर म्हणून नोकरी करायचे त्यामुळे रतन टाटा यांच्यासोबत त्याचा फोटो असल्याचे माणिकपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक भाऊसाहेब अहेर यांनी सांगितले. तर याच फोटोच्या आधारे त्यानेउद्योगपती रतन टाटा यांच्यासोबत घनिष्ठ संबंध असल्याच्या वावड्या उठवल्या होत्या. त्यामुळे आपलं कोणीही काहीही वाकडं करू शकणार नाही, असं म्हणत तो फसवत होता. पण पीडितेने तक्रार केल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. या व्यक्तीने आणखी किती जणांची फसवणूक केली याचा तपास पोलिस करत आहेत.

### करोना सवलतीमुळे गुन्हेगारीत

समिती नेमून विविध गुन्ह्यांत अटक झालेले आरोपी आणि दोष सिद्ध झाल्यावर शिक्षा भोगणाऱ्या कै द्यांना तात्पुरता जामीन आणि पॅरोलची मुभा उपलब्ध करून दिली. न्यायालयांनी परिस्थिती, पुरावे, आरोपीची पार्श्वभूमी पाहून जामीन अर्जावर निर्णय घेतला. मात्र तरीही गेल्या सव्वावर्षांत राज्यभरातील कारागृहांमधून सुमारे १२ हजार कै दी, आरोपी तात्पुरता जामीन, पॅरोल मिळवून बाहेर पडले. यात मुंबई महानगर प्रदेशातील आर्थर रोड, ठाणे, कल्याण आणि तळोजा कारागृहातून बाहेर पडलेल्यांची संख्या जास्त आहे. सराईत आरोपी सहजरीत्या जामिनावर सुटल्यानेच गुन्हे वाढल्याचे निरीक्षण मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्याने नोंदवले आहे. स्थानिक पोलीस, गुन्हे शाखा आरोपींना अटक करतात. मात्र आरोपी करोनाचे निमित्त पुढे करून जामीन मिळवतात. बाहेर येऊन पुन्हा गुन्हे करतात. विशेषत: चोर, पाकीटमार, मोबाइल चोर, वाहन चोर, सोनसाखळी चोर, घरफोडय़ा करणाऱ्यांचा उदरनिर्वाह गुन्ह्यांवर अवलंबून असतो. तसेच कितीही वेळा अटक झाली तरीही ते कारागृहातून सुटल्यावर पुन्हा गुन्ह्यांची मालिका सुरू ठेवतात, हा पोलिसांना येणारा नित्याचा अनुभव आहे.

### 49 वर्षांच्या संसारानंतर

उतारवयात एका क्षणात परके करण्यात आल्यामुळे त्या वृद्ध महिलेला प्रचंड धक्का बसला आहे. गोरेगाव परिसरात राहणाऱ्या एका मुस्लिम कुटुंबाची आरे परिसरात फार मोठी मालमत्ता आहे. या जमिनीवर असलेल्या मालमत्तेवर कुटुंबाला लाखो रुपये उत्पन्न मिळते. या उत्पन्नाची वाटणी नीट व्हावी यासाठी त्यांनी एक कंपनी स्थापन करून कुटुंबातील प्रत्येक सदस्याला भागीदार करून घेतले आहे. कंपनीचे मालक सलीम (बदललेले नाव) यांनी पत्नी अलिशासह दोन मुलांच्या नावे कंपनीतील भागीदारी टक्केवारीच्या प्रमाणात वाटून दिली होती. त्यानुसार अलिशा यांच्या नावावर कंपनीची ३० टक्के हिस्सेदारी होती. या हिस्सेदारीबाबत पॉवर ऑफ ॲटर्नी द्यावी अशी मागणी सलीम यांनी अलिशा यांच्याकडे केली. मात्र कोणतेही कागदपत्र करण्यास अलिशा यांनी नकार दिला. यामुळे संतापलेल्या सलीम यांनी तुला तलाक देतो, असे म्हणून तलाक म्हणायची ही पहिली वेळ आहे. पावर ऑफ ॲटर्नी दिली नाहीस तर तीन वेळा तलाक म्हणेन अशी धमकी दिली.

### दुर्गाडी खाडीवरील नवीन पुलाच्या

आणि एमएमआरडीए अधिकारी यांचे एकमत झाले. सहा मार्गिकांची रुंदी ७५ फुटाची आहे. यामधील २५ फुटांच्या दोन मार्गिका खुल्या करण्यात आल्या आहेत. उर्वरित ४८ फुटांच्या सहा मार्गिका डिसेंबपर्यंत खुल्या करण्यात येतील, अशी माहिती एमएमआरडीएच्या एका अधिकाऱ्याने दिली. खुल्या केलेल्या मार्गिकेतून मुंबई, भिवंडी दिशेने येणारी वाहने कल्याण शहरात येतील. जुन्या पुलावरील दुहेरी वाहतूक थांबवून या पुलावरून भिवंडीकडे जाणारी वाहने धावतील. गेल्या दोन वर्षांपासून एकाच पुलावरून ये-जा करणारी वाहने धावत होती. त्यामुळे पुलावर सतत कोंडी होत होती. नवीन मार्गिका खुली झाल्याने नोकरदारांनी समाधान व्यक्त केले.

### दहावीच्या मूल्यमापनापूर्वीच

दहावीचा निकाल हाती येण्यापूर्वीच अकरावीच्या शिकवणी वर्गातील प्रवेश सुरू झाले आहेत. अकरावीची प्रवेश परीक्षा होण्याची वाट न पाहता विद्यार्थी आणि शिक्षकांनीही पुढील तयारी सुरू केली आहे.

बारावीनंतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. सध्या विद्यार्थ्यांचे प्राधान्य असलेल्या वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुकला या परीक्षांसाठी राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षांना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागते. बारावीची राज्यमंडळाची परीक्षा आणि प्रवेश परीक्षांच्या तयारीचा पाया अकरावीच्या वर्गात तयार होत असतो. त्यामुळे अकरावीचा अभ्यासक्रम लवकर पूर्ण करून बारावी आणि प्रवेश परीक्षांची तयारी करण्याकडे शिकवण्यांचा कल असतो. त्यामुळे अकरावीची प्रवेश प्रक्रिया लांबली तर पुढील सर्व वेळापत्रकावर फरक पडतो.

एकत्रित महाविद्यालयांमध्ये छुपे प्रवेश?

अनेक खासगी महाविद्यालयांनी शिकवण्यांशी संधान बांधले आहे. गेल्या काही वर्षांपासून अशा एकत्रित संस्थांची संख्या मुंबई आणि उपनगरांमध्ये वाढली आहे. अशा शिकवण्यांमध्येही विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आले आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये या विद्यार्थ्यांचे काय होणार असाही प्रश्न यामुळे निर्माण होणार आहे.

प्रवेश प्रक्रिया लांबण्याची भीती

गेल्या वर्षी अकरावीचे वर्ग सरू होण्यास डिसेंबर महिना उजाडला. यंदाही प्रवेश परीक्षा घेण्याचे शासनाने जाहीर केले असले तरी त्याचे तपशील जाहीर झालेले नाहीत. तसेच ती कधी होणार, त्याबाबत काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवली किंवा काही आक्षेप आले तरीही प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यास उशीर होऊ शकतो. त्यानंतर आठ ते दहा प्रवेश फेऱ्या होऊन महाविद्यालये सुरू होण्यास यंदाही उशीर होणार आहे. निकालाच्या नियमित वेळापत्रकानुसार दहावीचा निकाल जूनच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होतो आणि लगेच प्रवेश प्रक्रिया सुरू होते. तेव्हा ऑगस्ट अखेरीस महाविद्यालये सुरू होतात. त्यामुळेही विद्यार्थ्यांनी शिकवण्या, सामायिक महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यास सुरुवात केली आहे, असे एका कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्यानी सांगितले.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार ०१ ते ०७ जून २०२१



संपादकीय...



# लक्षद्वीपचा मुकाबला

चंद्रपूरमधील दारूबंदी उठवण्यास विरोध करणारे भाजप समर्थक आता लक्षद्वीपमध्ये पर्यटन व्यवसाय अधिक वाढावा म्हणून दारूबंदी उठवणे आवश्यकच होते, असे म्हणत आहेत. मणिपूर आणि गोव्यासारख्या भाजपशासित राज्यांमध्ये स्थानिक जनतेचा कल आणि कौल यांना मान दिल्यामुळेच जी गोमांसबंदी लागू नाही, ती आता लक्षद्वीपसारख्या ९० टक्के मुस्लीम लोकसंख्या असलेल्या केंद्रशासित प्रदेशावर मात्र लादली जाते आहे. लोकसभेतील भाजप सदस्यांपैकी ९६ जणांना तीन वा अधिक अपत्ये असताना लक्षद्वीपमध्ये तीन अपत्ये असणाऱ्यांना ग्रामपंचायतीच्याही निवडणुका लढवू न देणे कसे योग्य, हेही आता सांगितले जात आहे. खुद्द लक्षद्वीपमध्ये भाजपच्या आठ पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिलेले असले तरी,



तेथील पक्षात फूट पडलेली नाही असे खुलासे करावे लागत आहेत. भाजपची ही लक्षद्वीपकेंद्री तारांबळ सुरू आहे, तिच्या मुळाशी एव्हाना वादग्रस्त ठरलेले या केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक प्रफुल्ल खोडा पटेल यांचे नवनवीन आदेश आहेत. केरळची बंदरे लक्षद्वीपला जवळची असूनही कर्नाटकमधील मंगलोर बंदरातूनच व्यापार करावा असे फर्मान या पटेलांनी काढले. समुद्रकिनाऱ्यावर मच्छीमारांनी उभारलेल्या शेड जमीनदोस्त करण्यापासून त्यांच्या कारकीर्दीची सुरुवात झाली आणि लवकरच, लोकसभेत २०१५ साली केंद्र सरकारला मागे घ्यावा लागलेला भूसंपादन कायदा प्रफुल्ल खोडा पटेल यांनी या केंद्रशासित प्रदेशात लागू केला. त्यामुळे आता कोणाचीही जमीन कोणतेही कारण न देता, सरकार ठरवेल त्या भरपाई रकमेत सरकारजमा होऊ शकेल. या सर्व निर्णयांपेक्षा अधिक वादग्रस्त ठरला आहे तो 'गुंडा ॲक्ट' म्हणून ओळखला जाणारा समाजविघातक कारवाया प्रतिबंधक कायदा, जो लक्षद्वीपमध्ये लागू झाल्यास समाजकंटक म्हणून राजकीय विरोधकांना किंवा प्रशासकांशी सहकार्य न करणाऱ्यांना चौकशीविना वर्षभर कोठडीत टाकण्याची मुभा प्रफुल्ल खोडा पटेल यांना मिळेल, असा विरोधी पक्षीयांचा आरोप आहे. हा कायदा लागू करण्याविरुद्धची याचिका केरळ उच्च न्यायालयाने दाखल करून घेतली असून प्रफुल्ल खोडा पटेल यांना नोटीस पाठवली आहेच, परंतु नव्या कारभाराला आवरा असे साकडे अनेक खासदारांनी राष्ट्रपतींनाही घातले आहे. अर्थात, वादग्रस्त ठरण्याचा आणि वाद हाताळण्याचा पुरेपूर अनुभव पटेल यांना आहे. दादरा नगरहवेलीचे खासदार मोहन डेलकर यांनी आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत प्रशासक म्हणून पटेल यांनी कसा त्रास दिला याची सविस्तर माहिती दिली होती. डेलकर यांच्या आत्महत्येस पटेल हेच जबाबदार असल्याचा आरोप त्यांच्या मुलाने केला होता. डेलकर यांच्या चिठ्ठीच्या आधारे मुंबई पोलिसांनी पटेल आणि अन्य आठ जणांच्या विरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल गुन्हा दाखल केला. पण गेल्या तीन महिन्यांत मुंबई पोलिसांना पटेल यांचा साधा जबाबही नोंदवून घेता आलेला नाही. कारवाई तर पुढील बाब. प्रफुल्ल खोडा पटेल हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विश्वासातील मानले जातात. २०१० च्या जुलैमध्ये अमित शहा यांना कायद्याच्या कचाटय़ात अडकल्यामुळे गुजरातचे गृहमंत्रिपद सोडावे लागल्यानंतर तेव्हाचे मुख्यमंत्री या नात्याने नरेंद्र मोदी यांनी, राज्याच्या गृह राज्यमंत्रिपदी पटेल यांची नेमणूक केली होती. हिम्मतनगर मतदारसंघातून २०१२ पासून पटेल पराभूत झाले, तरी बांधकाम व्यावसायिक म्हणून कार्यरत होतेच आणि पुढे २०१६ मध्ये दमण व दीवचे आणि त्याच वर्षीच्या डिसेंबरात दादरा व नगरहवेलीचे प्रशासकपद त्यांना मिळाले. तेथेही त्यांनी किनारपट्टीवरील आदिवासींच्या वसाहती अनधिकृत असल्याकडे नेमके लक्ष वेधून त्या जमीनदोस्त केल्या होत्या. शिवाय, या दोन केंद्रशासित प्रदेशांचे एकीकरण करण्यात त्यांनी पुढाकार घेतल्याने, दमणलाच यापुढे अधिक निधी मिळणार अशी नाराजीही व्यक्त होत होती.

या अशा पूर्वेतिहासामुळे, प्रफुल्ल खोडा पटेल हे लक्षद्वीपचे भगवेकरण करीत असल्याचा आरोप केला जातो. परंतु तो करणाऱ्या विरोधकांवर अर्थातच, मुस्लीमधार्जिणेपणाचा आरोप भाजप समर्थक अधिक जोमाने करू शकतात आणि अखेर ही आरोपबाजी निव्वळ बालिशपणाच्या पातळीला जाते. लक्षद्वीपमधील प्रफुल्ल खोडा पटेल यांचे काही निर्णय मुस्लीमविरोधी ठरवले जाऊ शकतीलही, परंतु आतापर्यंत तरी त्या बेटांवरून पटेल यांना होणाऱ्या विरोधाचे मुद्दे निराळे आहेत. त्यात भूसंपादनाचा मुद्दा आहे तसेच मोठय़ा प्रमाणावर, हंगामी तत्त्वावरील शिक्षक आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्यात आल्या किंवा महत्त्वाच्या सरकारी पदांवर दाक्षिणात्यांऐवजी हिंदी भाषक अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यावर भर दिल्याचा आक्षेप आहे.

# नव्याने मांडा..

वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या ४३ व्या बैठकीत करोनाविषयक आयात औषधे वा उपकरणे यांवरील कर सवलतीचा निर्णय घेतला गेला. प्रकृतिअस्वास्थ्यासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्यास ज्याप्रमाणे तातडीने सलाइन वगैरे लावले जाते, इतका हा निर्णय नैसर्गिक आहे. त्यात ना शल्यकाच्या.. या प्रकरणात अर्थमंत्री.. रोगनिदानाच्या कौशल्याची कसोटी लागली, ना रुग्णाच्या प्रकृतीविषयी.. म्हणजे अर्थव्यवस्था.. निश्चिंत व्हावे अशी खात्री निर्माण झाली. तब्बल सात महिन्यांच्या प्रदीर्घ खंडानंतर झालेल्या या बैठकीत वस्तू/सेवा कर परिषदेसमोरची आव्हाने काय आहेत आणि प्रत्यक्षात झाले काय, हे सारे पाणी किती खोल आहे ते दाखवून देणारे आहे. म्हणून ही परिषद आणि अर्थवास्तव याचा आढावा समयोचित ठरतो.

वस्तू/सेवा कर २०१७ साली अमलात आला त्या वेळी दोन महत्त्वाचे निर्णय घेतले गेले. एक म्हणजे, दर दोन महिन्यांनी राज्यांना कराची क्षतिपूर्ती दिली जाईल आणि दर तीन महिन्यांनी वस्तू/सेवा कर परिषदेची बैठक घेतली जाईल. या दोन्ही नियमांची पायमल्ली केंद्रानेच केली.

राज्यांना केंद्राकडून आवश्यक ते पैसे निर्धारित टप्प्यांत मिळालेले नाहीत आणि या परिषदेची बैठकही दोन तिमाहींत झालेली नाही. शुक्रवारी, २८ मे रोजी झालेली बैठक दूरदृक्संवादातून झाली. कारण करोनाकालीन प्रवास निर्बंध. म्हणजे अशा पद्धतीनेच जर बैठक घ्यायची होती तर ती याआधीही घेता आली असती. याचा अर्थ करोना हे केवळ बैठक टाळण्याचे कारण. अवघड विषयांची परीक्षा टाळण्याकडे अभ्यास न झालेल्या विद्यार्थ्यांचा कल असतो. वस्तू/सेवा कर परिषदेच्या बैठकीचे हे असे झाले. यामागील 'सहकारी संघराज्य' संबंधांचा मुद्दा असा की, या सात महिन्यांत एकाही भाजपशासित राज्यास या बैठकीची मागणी करावी असे वाटले नाही. वास्तविक सध्या सर्वच राज्ये आर्थिक वरवंटय़ाखाली आलेली आहेत. पण या वरवंटय़ाचे नियंत्रण स्वपक्षीयाच्या हाती असल्याने भाजपशासित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना याबाबत ब्र काढायचीही हिंमत नाही.

या परिषदेच्या ३१ सदस्यांपैकी १७ जण हे भाजप वा रालोआचलित राज्यांचे आहेत. म्हणजे या राज्यांची बांधिलकी आपापल्या प्रांतांपेक्षा पक्षीय विचारसरणीशी अधिक आहे, हे यातून अत्यंत ठसठशीतपणे समोर येणारे सत्य. उर्वरित १४ राज्यांच्या मुख्यमंत्री/ अर्थमंत्र्यांनी या काळात वस्तू/सेवा कर परिषदेची बैठक घेतली जावी अशी मागणी अनेकदा केली. ही १४ राज्ये डझनभर पक्षांच्या हाती आहेत आणि हे प्राधान्याने भाजपविरोधी आहेत. या राज्यांना आर्थिक चणचण जाणवते आणि भाजपचलित राज्यांना मात्र सर्व आलबेल वाटते, यातच या व्यवस्थेतील मोठी त्रुटी दिसून येते.

असा ठाम निष्कर्ष काढता येतो याचे कारण राज्यांचा निम्मा महसूल या कराची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून केंद्राकडून महसूल-क्षतिपूर्तीपोटी दिला जाणे अपेक्षित आहे. ते झाले नाही. बैठकीप्रमाणे दर दोन महिन्यांनी राज्यांना पैसे देणे खंडित झालेले आहे. यामागील कारणे काहीही असोत. पण हा कायदेभंग ठरतो. सध्या त्यास करोनाचे कारण आहे. पण ज्याप्रमाणे सामान्य नागरिकास अपरिहार्य परिस्थितीतही कायदेभंग करून चालत नाही, त्याप्रमाणे सरकारांनाही नियमभंगाचा अधिकार नाही. म्हणजे सरकार करोनाकडे बोट दाखवून स्वत:चे पापक्षालन करू शकत नाही. म्हणून महाराष्ट्रासारखे राज्य आपल्या २४ हजार कोटी रुपयांच्या परताव्यासाठी तगादा लावत असेल, तर ते पूर्णपणे समर्थनीय ठरते. ज्याप्रमाणे केंद्रासमोर आवश्यक ते खर्च आणि अडचणी यांचे आव्हान आहे, त्याचप्रमाणे ते राज्यांसमोरही आहे.

केंद्रास करोनाकडे बोट दाखवून आपली निष्क्रियता झाकता येणारी नाही. आपल्यासारख्या खंडप्राय, बहुविधता असलेल्या देशात सर्व राज्ये वस्तू/सेवा कराच्या मुद्दय़ावर एकत्र आली तीच मुळी केंद्राने स्वत:वर घालून घेतलेल्या निर्बंधांमुळे. त्यानुसार सर्व राज्यांस दरसाल त्यांच्या सरासरी कर महसुलावर १४ टक्के वाढ गृहीत धरून उत्पन्नवाटप केले जाईल, अशी हमी हा कायदा देतो.

पण केंद्र सरकार याबाबतही कायदेभंग करते. ही १४ टक्के वाढ देणे राहिले बाजूला. राज्यांस नियमितपणे क्षतिपूर्तीसाठी कर महसुलातील वाटपही करणे केंद्रास जमलेले नाही. सध्याच्या, म्हणजे २०२१-२२ या आर्थिक वर्षांत या महसुली वाटपापोटी दोन





लाख ७० हजार कोटी रुपये इतकी प्रचंड रक्कम केंद्राने देणे अपेक्षित आहे. पण तिजोरीत आहे खडखडाट. गेल्या वर्षीही कर संकलनातील गळतीमुळे केंद्राच्या तिजोरीत अपेक्षित महसूल जमा होऊ शकला नाही. ती रक्कम अपेक्षेपेक्षा १.१ लाख कोट रुपयांनी कमी होती. मग नाइलाज म्हणून केंद्रास राज्यांची कर्जउभारणी मुभा वाढवावी लागली.

यंदाची परिस्थितीही गेल्या वर्षीपेक्षा फार काही वेगळी नाही. गेल्या वर्षीची तूट लाखभर कोटी रुपयांची होती. यंदा ती अडीच लाख कोट रुपयांपेक्षा अधिक असेल, असा अंदाज अनेक तज्ज्ञांनी वर्तवला आहे. तो सरकार वा भक्तांकडून फेटाळण्यात आलेला नाही वा त्यांना राष्ट्रद्रोहीही अद्याप ठरवण्यात आलेले नाही. याचा अर्थ सरकारला तो मान्य आहे. म्हणजे तसे असेल तर हा खड्डा.. वास्तविक दरीच ती.. भरून काढण्यासाठी केंद्रास स्वत:लाच कर्ज उभारावे लागेल. याचाच दुसरा अर्थ असा की, वित्तीय तुटीच्या मर्यादेकडे काणाडोळा करावा लागेल.

आणखी एक गुंतागुंतीचा मुद्दा. महाराष्ट्राचे अर्थमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य काही राज्यांनीही तो उपस्थित केला. तो आहे राज्यांना नुकसानभरपाई देण्याबाबत. केंद्राने वस्तू/सेवा कर अंमलबजावणीच्या सुरुवातीपासून स्वत:स राज्यांना पाच वर्षे नुकसानभरपाई देण्यास बांधून घेतले. त्यानुसार केंद्र सरकार सर्व राज्यांना २०२२ पर्यंत कर महसुलातील तुटीची भरपाई देण्यास बांधील आहे. पण सुरुवातीपासूनच या कराची जी काही दैना उडाली आणि त्यामुळे राज्यांना जे आवश्यक ते उत्पन्न मिळाले नाही, हे पाहता विविध राज्ये आता ही पाच वर्षांची मुदत वाढवण्याची मागणी करताना दिसतात.

राजकीय अभिनिवेश दूर सारून विचार केल्यास ती रास्त ठरते. पण यात पंचाईत अशी की, असा निर्णय घेण्याचा अधिकार सरकारलाही नाही. म्हणजे तो घ्यायचा झाल्यास घटनादुरुस्ती करणे आले.

त्याचेच सूतोवाच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या २८ मेच्या बैठकीनंतर केले गेले. त्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलवावे लागेल असेही या संदर्भात सांगण्यात आले. पण पंचाईत अशी की, तसे ते बोलावल्यास राज्ये या कायद्यासंदर्भातील अन्य त्रुटी उपस्थित करणारच नाहीत, असे नाही. किंबहुना त्या अहमहमिकेने केल्या जाणार. कारण २८ मेच्या बैठकीआधी महत्त्वाच्या बिगर-भाजपशासित राज्यांनी एकत्र येऊन या संदर्भात मोर्चेबांधणी सुरूही केली. म्हणजे तसे झाल्यास अनेक वादग्रस्त मुद्दय़ांवर सरकारला उत्तर द्यावे लागेल. म्हणजे संपूर्ण वस्तू/सेवा कराचीच छाननी होणार.

वास्तवात तशी वेळ आलेलीच आहे. कोणताही कायदा हा वैज्ञानिक सत्यासारखा अंतिम नसतो. शहाणे आणि प्रागतिक त्यात काळानुरूप बदल करण्याचे चापल्य आणि चातुर्य दाखवतात.

ते आता सरकारला दाखवावे लागेल. 'लोकसत्ता'सह अनेक तटस्थ अभ्यासक-निरीक्षक या वस्तू/सेवा कर कायद्यातील ढळढळीत उणिवा पहिल्या दिवसापासून दाखवत आहेत. त्या मान्य करून वस्तू/सेवा कराची नव्याने मांडणी करण्याचा हाच तो क्षण.

तो वाया घालवल्यास देशाचा प्रवास आर्थिक अनागोंदीच्या दिशेने सुरू होईल. ते टाळायचे असेल तर चुका मान्य करण्याचा मोठेपणा न दाखवताही त्या दुरुस्त कराव्या लागतील. त्यास पर्याय नाही.

# दारुच्या अड्ड्यावर धाड टाकायला गेलेल्या पोलिसांवर जमावाचा प्राणघातक हल्ला





सोलापूर: माळशिरस तालुक्यातील वेळापूर येथे पारधी वस्तीत हातभट्टी दारुच्या अड्ड्यावर धाड टाकण्यासाठी गेलेल्या पोलिसांवर वस्तीतील पारध्यांनी अचानक केलेल्या हल्ल्यात वेळापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक भगवान खारतोडे गंभीर जखमी झाले आहेत, तर इतर दोन पोलिस कर्मचारीही जखमी झाले आहेत. ही घटना काल शुक्रवारी सायंकाळी सातच्या सुमारास घडली. वेळापूर येथील पालखी मैदानालगत पारधी समाजाची वस्ती आहे. त्याठिकाणी हातभट्टी दारूचा अड्डा सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. याबाबत माहिती असूनही पोलिसांनी या वस्तीत आतापर्यंत मोठी कारवाई केली नव्हती. पण करोना काळात सर्व बंद असताना दारु अड्डा सुरुचं असल्याचे समजल्यावर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कार्यालयाच्या बाजूला पारधी वस्तीतल्या दारू अड्ड्यावर धाड टाकण्यासाठी पोलिस निरीक्षक भगवान खारतोडे आणि इतर सहा कर्मचारी गेले. त्यावेळी वस्तीतील एका अनोळखी इसमाने पीआय खारतोडे यांच्या डोक्यावर लाकडाचा घाव घालून गंभीर जखमी केले. त्यांच्या सोबत असणारे पोलिस कर्मचारी विठ्ठल बंदुके आणि पोलिस नाईक दीपक मेहकर हेही या हल्ल्यात जखमी झाले अशी माहिती प्रत्यक्षदर्शी पोलिस इतर कर्मचाऱ्यानी दिली.

पोलिस निरीक्षक खारतोडे यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने ते रक्तबंबाळ झाले. त्यांच्यासह जखमी पोलिसांना तातडीने वेळापूर येथील माने देशमुख हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेची माहिती कळताच अकलूज पोलिस उपविभागीय अधिकारी नीरज राजगुरू यांनी तातडीने रुग्णालयामध्ये धाव घेऊन जखमींची विचारपूस केली. प्रत्यक्षदर्शी कर्मचाऱ्यांकडून घटनेबाबत माहिती घेऊन कर्मचाऱ्यांना तातडीच्या सूचना करून तपासाची सूत्रे हाती घेतली आहेत. रात्री उशिरा जखमी पीआय खारतोडे यांना पुढील उपचारासाठी अकलूजमधील खासगी रुग्णालयात हलवले असून पुढील तपास सुरु आहे.

# भीमानदीत पोहायला गेलेल्या एकाच कुटुंबातील चौघांचा बुडून मृत्यू



सोलापूर: पोहता येत नसतानाही नदीच्या वाहत्या पात्रात उतरल्याने एकाच कुटुंबांतील चौघा बालकांचा भीमानदीत बुडून मृत्यू झाला आहे. ही दुर्दैवी घटना आज दुपारी साडेतीन वाजता दक्षिण सोलापूर तालुक्यातल्या लवंगी गावात घडली आहे.याबाबतची सविस्तर घटना अशी की, आज दुपारी ३:३० वाजता दक्षिण सोलापुरातील लवंगी येथे राहणारे शिवाजी रामलिंग तानवडे (वय ४० वर्षे) हे भीमा नदीमध्ये पोहण्यासाठी गेले होते. तेथे थोड्या वेळाने त्यांच्या मागे तिच्या दोन मुली समीक्षा व आर्पिता आणि सोबत मेव्हण्याचा मुलगा विठ्ठल व मुलगी आरती असे चौघे नदीकडे आले. तेव्हा त्यांना घराकडे जायला सांगून देऊन शिवाजी हे पोहत नदीमध्ये आत गेले. पण थोड्या वेळाने ते चौघे परत नदीमध्ये पोहण्यासाठी उतरले. मुलगी समीक्षाला पोहता येत होते, परंतु अर्पिताला थोडे थोडे पोहता येत होते. त्यावेळी ते चौघे नदीपात्रात अंघोळीसाठी उतरले. समीक्षाला पाण्यात पोहत असताना आरतीने पकडले व अर्पितास विठ्ठल याने पकडल्याने ते चौघे बुडत असताना त्यांचा आवाज ऐकून शिवाजी लगेच त्यांच्याजवळ पोहत गेला. त्यानंतर त्याने समीक्षा व आरती यांना थोडेसे बाजूला किनाऱ्याजवळ सोडून त्यांना किनाऱ्यावर जाण्यास सांगितले. मग अर्पिता व विठ्ठल यास सोबत कडेला आणत असताना पाहिले असता समीक्षा व आरती या पाण्याच्या प्रवाहामुळे बुडाल्या व शिवाजीच्या ताब्यातील विठ्ठल व अर्पिता पण निसटले व ते पण बुडून गेले.

# वर्दीतील दरोडेखोर लवकरच गजाआड जातील; मुश्रीफांचा सूचक इशारा

कोल्हापूर: 'राज्याचे परिवहन मंत्री अनिल परब यांच्यावर निलंबित असलेल्या परिवहन खात्याच्या गजेंद्र पाटील या उपनिरीक्षकांने गुन्हा दाखल करून सीबीआयकडे चौकशीची मागणी केली आहे. हा गजेंद्र पाटील म्हणजे परमवीर सिंगचा दुसरा भाऊच दिसतो. वर्दीतील हे दरोडेखोर उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आडून हजारो कोटींचा त्यांचा गैरव्यवहार लपवू पाहात आहेत. वर्दीतील हे दरोडेखोर लवकरच गजाआड जातील,' असा सूचक इशारा ग्रामविकास मंत्री

हसन मुश्रीफ यांनी दिला. 'उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात न्याय देऊन लवकरच दूध का दूध आणि पाणी का पाणी होईल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कागलमध्ये पत्रकार परिषदेमध्ये मंत्री मुश्रीफ बोलत होते. ते पुढे म्हणाले, 'ज्या पद्धतीने परमवीर सिंग यांनी शंभर कोटींचे पत्र देऊन अनिल देशमुख यांच्यासारख्या चांगल्या मंत्र्याचा राजीनामा द्यायला लावला होता त्याच पद्धतीचे हे षडयंत्र आहे', असा आरोप मुश्रीफ यांनी केला आहे. तसंच, 'महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री अजित पवार यांनी करोना उपचारामधील साहित्यावरील जीएसटी रद्द करावा, अशी मागणी केली होती. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी यासंबंधी एक समिती नेमून मेघालयासारख्या छोट्या राज्याच्या अर्थमंत्र्यांना



अध्यक्षपद दिले. या माध्यमातून त्यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्राचा अपमान केलेला आहे. वास्तविक, महाराष्ट्र देशात सर्वात जास्त जीएसटी देणारे तसेच करोना बाधितांची संख्याही जास्त असणारे राज्य आहे. या समितीचे अध्यक्षपदही महाराष्ट्राला द्यायला हवे होते,' असं म्हणत त्यांनी केंद्र सरकारवर नाराजी व्यक्त केली आहे.

'केंद्र सरकारने जीएसटीच्या परताव्या पोटीचे २४ हजार कोटी रुपये गेल्या दोन वर्षापासून दिलेले नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातसह पश्चिम बंगाल, ओरिसा या राज्यांचा दौरा करून त्यांना एक हजार कोटींचे पॅकेज दिले. परंतु, गेल्याच आठवड्यात झालेल्या चक्रीवादळाच्या नुकसानीपोटी केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला एक रुपयासुद्धा दिलेला नाही. या पद्धतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकार सतत महाराष्ट्राचा अपमान आणि खच्चीकरण करीत आहेत,' अशी टीका मुश्रीफ यांनी केली आहे.

# गाव करोनामुक्तीसाठी ठाणे जिल्हा परिषदेचे प्रयत्न

ठाणे : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी रविवारी 'गाव करोनामुक्त करा' असे आवाहन करताच ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील गावे करोनामुक्त करण्यासाठी जिल्हा परिषदेने तातडीने उपाययोजना आखण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही दिवसांपासून जिल्हा परिषदेने लसीकरण जागृतीसाठी वेगवेगळे कार्यक्रम हाती घेतले आहेत. या सोबत आता ग्रामीण भागात रुग्णशोध मोहीम तसेच उपचार प्रक्रिया वेगाने व्हावी यासाठी पायाभूत सुविधांच्या उभारणीवर जोर दिला जाणार आहे. ठाणे जिल्ह्याच्या भिवंडी, अंबरनाथ, कल्याण, मुरबाड आणि शहापूर या ग्रामीण तालुक्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून करोनाचा संसर्ग वाढत आहे. ग्रामीण भागात दिवसाला सरासरी शंभरच्या आसपास रुग्ण आढळून येत आहेत. सध्या या भागांत १ हजार १७९ रुग्णांवर करोनाचे उपचार सुरू आहेत. या भागांमध्ये रुग्णसंख्या आटोक्यात आणण्यासाठी जिल्हा परिषदेने विविध उपाययोजना राबवण्यास सुरुवात केली आहे. गावातील नागरिकांनी करोना नियमांचे पालन करावे यासाठी समाजमाध्यमांमार्फत जनजागृती करण्यात येत आहे. करोनापासून नागरिकांनी बचाव करण्यासाठी कोणत्या नियमांचे पालन केले पाहिजे याची माहिती देण्यात येते. तसेच गावातील ४५ वर्षांपुढील लाभार्थी नागरिकांचे लवकरात लवकर लसीकरण व्हावे नागरिक स्वत:हून लसीकरणासाठी केंद्रांवर यावेत यासाठी आशा सेविका, शिक्षक यांच्या साहाय्याने गावागावांत सर्वेक्षण करण्यात येत आहे. तसेच ध्वनिक्षेपकाच्या, चित्रफीत, लघुपट यांच्या माध्यमातून गावोगावी बोलीभाषेतून लसीकरणाविषयी जनजागृती करण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण भागातील लसीकरणाचा वेगही वाढला आहे. त्याचबरोबर, गाव करोनामुक्त करण्यासाठी जिल्हा परिषदेने नव्याने उपाययोजना आखण्यास सुरुवात केली आहे. ठाणे ग्रामीण भागात पूर्वी दिवसाला केवळ २०० ते ३०० नागरिकांच्या करोना चाचण्या करण्यात येत होत्या. आता यामध्ये वाढ करण्यात येणार असून दिवसाला ५०० ते ६०० नागरिकांच्या चाचण्या करण्याचे ध्येय जिल्हा परिषदेने निश्चित केले आहे. या चाचणी अहवालात करोनाबाधित रुग्णाच्या अतिजवळच्या व्यक्तींचा तात्काळ शोध घेण्यात येणार आहे. यामुळे करोना संसर्ग पसरण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे यांनी सांगितले.

# अशीच गर्दी राहिली तर पुन्हा कठोर निर्बंध

मुंबई : करोनाच्या दुसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर मुंबई आणि राज्यात लागू करण्यात आलेले निर्बंध काहीप्रमाणात शिथिल करण्यात आले असले तरी ही बंधने अजून उठवलेली नाहीत. करोनाचा धोका अजूनही टळलेला नाही. पण मुंबईतील आजची गर्दी चिंताजनक आहे. अशीच गर्दी राहिली तर पुन्हा कडक निर्बंध लावावे लागतील असा इशारा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सोमवारी मुंबईकरांना दिला.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या(एमएमआरडीए)ड हाणूकरवाडी ते आरे स्थानका दरम्यानच्या मेट्रो मार्गिकांच्या चाचणीचा शुभारंभ प्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते पश्चिम द्रुतगती महामार्ग (टर्मिनल १ अणि २) येथील नियंत्रित प्रवेश भुयारी-उन्नत मार्ग प्रकल्पाचे भूमिपूजन, राजणोली उड्डाण पुल मार्गिका आणि दुर्गाडी पुलाच्या दोन मार्गिकांचे ई लोकार्पण ठाकरे यांच्या हस्ते झाले.राज्यात करोनाचे कडक निर्बंध असताना विकासाचा वेग मंदावला नाही. याकाळात एमएमआरडीएने उपचारांच्या सुविधा निर्माण करतानाच मुंबई सारख्या वेगवान महानगराचा विकासाचा वेग कमी होऊ दिला नाही. मुंबई वाढतेय तसा तिच्या विकासाचा वेगही कायम राखतोय असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, विविध पायाभूत आणि दळणवळणाच्या प्रकल्पांमुळे मुंबई जो वेग घेत आहे त्या प्रवासात मुख्यमंत्री म्हणून सहभागी होता



आले. मुंबई मेट्रोच काम आखीव-रेखीव आणि देखणे झाले आहे. मेट्रोची स्थानके, कोच यासाठी नव्या पिढीच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. करोना काळात विकास कामांचा पुढचा टप्पा वेगाने पार पाडावा अशा सूचनाही त्यांनी यावेळी प्राधिकरणास दिल्या. दुर्गाडी पुल आणि राजनोली उड्डाणपुलाचे काम झाल्यामुळे मुंबई महानगर परिसरातील नागरिकांना फायदा होणार असल्याचे नगरविकास मंत्री शिंदे यांनी सांगितले. प्राधिकरणाचे महानगर आयुक्त आर. ए. राजीव यांनी प्रास्ताविक केले. अतिरिक्त आयुक्त डॉ. गोविंदराज यांनी आभार मानले.मुंबई मेट्रो-२ आणि मेट्रो-७ या दोन्ही मेट्रो लाईनच्या चाचणीच्या निमंत्रणपत्रिकेवर मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री यांची तसेच विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर यांची नावे होती. पण विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना आमंत्रित करण्यात न आल्याने भाजपने या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला व निषेध आंदोलनही केले.

केंद्राचा भेदभाव – अजित पवार

राज्यकर्ते येत असतात, जात असतात बदल होत असतात. शेवटी जनतेच्या मनात जे असते जनता त्यांना निवडून देत असते. नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांच्या निवडणुकांमधून आपण सर्वांनी हे पाहिले आहे. शेवटी वरच्या ठिकाणी देखील कुणीही राज्यकर्ते असले, मागील काळात मनमोहन सिंग, शरद पवार, पी. चिदंबरम हे काम करत होते, तेव्हा असा भेदभाव कधी होत नव्हता. मात्र आता तो थोडासा जाणवतो आहे. यामध्ये कितपत तथ्य आहे नाही याबाबत सगळ्यांनी नीट विचार करावा, एवढीच माझी अपेक्षा आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मदतीमधील भेदभावाबाबत नाराजी व्यक्त केली.

तौक्ते चक्रीवादळानंतर पंतप्रधान सर्वप्रथम मुंबईत येणार होते, त्यानंतर ते गुजरातला जाणार होते. मात्र काही कारणाने पंतप्रधानांचा दौरा रद्द झाला, याचे कारण आम्हाला कळू शकले नाही, असेही त्यांनी नमूद केले.

# "दिल्लीत गेल्यावर तेवढं मोदींना सांगा," कार्यक्रमात भाषणादरम्यानच पवारांची रामदास आठवलेंना विनंती

मुंबईतील मेट्रोच्या २ ए आणि ७ या दोन मार्गिकांचं सोमवारी उद्घाटन झालं. उद्घाटनादरम्यान बोलताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्र सरकार निशाणा साधत जोरदार टीका केली. आजपर्यंत केंद्रात कोणाचंही सरकार असलं तरी राज्यांना मदत देताना इतका भेदभाव झाला नव्हता अशी खंत अजित पवार यांनी यावेळी व्यक्त केली. तसंच याचा विचार होणं गरजेचं आहे, असंही म्हटलं. दरम्यान यावेळी व्यासपीठावर उपस्थित केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांना अजित पवारांनी विनंती केली.

"रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री आणि माझ्याशी बोलताना महाराष्ट्राला लागणाऱ्या मदतीबद्दल विचारपूस केली.



त्यामुळे मी रामदास आठवले यांना तौते चक्रीवादळातील पीडितांना केंद्र सरकारकडून योग्य ती मदत मिळवून द्यावी. तुम्ही दिल्लीत जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटा आणि महाराष्ट्राला मदत मिळवून द्या," अशी विनंती अजित पवार यांनी केली."गुजरातने मागणी केलेली नसतानाही पंतप्रधानांनी १००० कोटींची मदत जाहीर केली, पण महाराष्ट्राला कोणतीही मदत नाही," असं अजित पवारांनी यावेळी सांगितलं.

"तौते चक्रीवादळानंतर पंतप्रधान सर्वप्रथम मुंबईत येणार होते, त्यानंतर ते गुजरातला जाणार होते. मात्र काही कराणाने पंतप्रधानांचा इकडचा दौरा रद्द झाला, याचं कारण आम्हाला कळू शकलं नाही. परंतु पंतप्रधान थेट गुजरातला गेले अन् गुजरातची काही मागणी नसताना देखील तात्काळ त्यांनी १ हजार कोटी जाहीर केले. महाराष्ट्राला जेवढे योग्य वाटतील तेवढे तरी पैसे त्यांनी द्यायला हवे, त्यातही आम्ही समाधानी होऊ." असं अजित पवार म्हणाले आहेत. "राज्यकर्ते येत असतात, जात असतात… बदल होत असतात. शेवटी जनता निवडून देत असते. नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांच्या निवडणुकांमधून आपण सर्वांनी हे पाहिलं आहे. मागील काळात मनमोहन सिंग, शरद पवार, पी. चिदंबरम हे काम करत होते, तेव्हा असा भेदभाव कधी होत नव्हता. मात्र तो थोडासा जाणवतो आहे. यामध्ये कितपत तथ्य आहे नाही याबाबत सगळ्यांनी नीट विचार करावा, एवढीच माझी निमित्त अपेक्षा आहे." असंही अजित पवारांनी बोलून दाखवलं.

# ठाण्यातील दुकाने आता 7 ते 2 खुली



ठाणे : महापालिका क्षेत्रामध्ये करोना चाचण्यांमध्ये रुग्ण आढळून येण्याचे प्रमाण दहा टक्क्यांपेक्षा कमी असल्यामुळे प्रशासनाने मंगळवारपासून सर्वच आस्थापना सुरू करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार अत्यावश्यक सेवेसह इतर एकल दुकाने सकाळी ७ ते २ वाजेपर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. यानुसार शहरातील गोखले रोड, राम मारुती रोड तसेच इतर प्रमुख बाजारपेठातील दुकाने सुरू होणार आहेत. मात्र, मॉल आणि शॉपिंग सेंटरमधील दुकानांना परवानगी देण्यात आलेली नाही. गर्दी टाळण्यासाठी शनिवार आणि रविवारी अत्यावश्यक सेवा वगळता इतर दुकाने बंद राहणार आहेत. तसेच दुपारी २ वाजेनंतर नागरिकांना विनाकारण फिरण्यास बंदी आहे. या नियमांचा दुकानदारांनी भंग केला तर, करोना साथ संपेपर्यंत दुकाने बंद ठेवण्यात येतील. करोना चाचणीत दहा टक्के किंवा त्यापेक्षा कमी करोनाबाधितांचे प्रमाण तसेच प्राणवायूयुक्त खाटा ४० टक्क्यांपेक्षा कमी भरलेल्या असतील तर, निर्बंध शिथिल करण्याचे अधिकार राज्य सरकारने महापालिकांना दिले आहेत.

# आर्थिक दुर्बलांसाठीचे आरक्षण मराठा समाजास लागू



मुंबई : सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी (मराठा समाज) आरक्षणाची तरतूद असलेला महाराष्ट्र सरकारचा कायदा सर्वोच्च न्यायालयाने अवैध ठरविल्याने राज्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे (ईडब्ल्यूएस) १० टक्के आरक्षण मराठा समाजाला लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शासकीय नोकऱ्या व शिक्षणातील प्रवेशासाठी 'ईडब्ल्यूएस' आरक्षणाच्या लाभासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांच्या आत असावे, अशी अट घालण्यात आली आहे. संसदेने १०३ वी घटनादुरुस्ती करून अराखीव वा खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी शिक्षणातील प्रवेश व शासकीय सेवेतील नियुक्त्यांसाठी १० टक्के राखीव जागा ठेवण्याचा कायदा के ला. राज्यात १२ फे ब्रुवारी २०१९ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू आहे. मात्र, राज्य सरकारने २०१८ मध्ये मराठा समाजाच्या आरक्षणासाठी स्वतंत्र 'एसईबीसी' कायदा के ल्याने त्यांना राज्यात 'ईडब्ल्यूएस' आरक्षण लागू करण्यात आले नव्हते. तथापि, के ंद्रीय सेवा व शिक्षण संस्थांमधील प्रवेशासाठी वार्षिक उत्पन्नाच्या निकषानुसार मराठा समाजाला हे आरक्षण लागू करण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने ५ मे २०२१ रोजी 'एसईबीसी' कायदा अवैध ठरविल्याने राज्यात मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षणापासून वंचित राहावे लागले. त्यांना आरक्षणाच्या कक्षेत आणण्यासाठी केंद्र सरकारचे 'ईडब्ल्यूएस' आरक्षण लागू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार शासकीय, खासगी अनुदानित, विनाअनुदानित विद्यालये, महाविद्यालये, स्वायत्त विद्यापीठे व इतर शिक्षण संस्थांमधील प्रवेशासाठी, तसेच शासकीय, निमशासकीय सेवा, मंडळे, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, प्राधिकरणे यांमधील नियुक्त्यांमध्ये 'ईडब्ल्यूएस' आरक्षणाचा लाभ मराठा समाजालाही मिळणार आहे. त्यासाठी ८ लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्नाची अट राहणार आहे. कु टुंबाच्या एकत्रित वार्षिक उत्पन्नात वेतन, कृषी, उद्योग-व्यवसायांतून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश करण्यात आला आहे. अल्पसंख्याक शिक्षण संस्थांमध्ये हे आरक्षण लागू राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

# मोबाइल कमी वापर म्हटल्याने मुलगा वडिलांवर संतापला; केलं हादरवणारं कृत्य



बुलडाणा, मोबाइलचा वापर जरा कमी कर, असा सल्ला दिला असता २१ वर्षीय मुलाने वडिलांच्या डोक्यावर कुऱ्हाडीचे वार करून हत्या केली. ही घटना घटना मेहकर शहरातील समतानगर येथे २९ मे रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास घडली. अमडापूर येथील जिल्हा बँकेत शाखाधिकारी म्हणून कार्यरत असलेले गजानन संपत गवई (वय ५३) हे पत्नी व मुलगा शुभम याच्यासोबत मेहकरातील समतानगरमध्ये राहत होते. शनिवारी त्यांनी शुभमला नेहमीप्रमाणे मोबाइल कमी वापर आणि अभ्यासाकडेही लक्ष दे असे म्हटले. यावरून संतापलेल्या शुभमने घरातील कुऱ्हाडीने वडिलांच्या डोक्यात व छातीवर वार केले. यात गजानन गवई यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच ठाणेदार आत्माराम प्रधान यांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेचा पंचनामा केल्यानंतर शुभमशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो पोलिस स्टेशनच्या आजूबाजूलाच घुटमळत असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी रात्रीच त्याला ताब्यात घेतले. शुभम हा औरंगाबाद येथे अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षाला शिकत असल्याची माहिती आहे.

# लोकलच्या डब्यात शिरलेल्या चोरट्यानं महिलेच्या हातातून मोबाईल हिसकावला; अन्....

कल्याण, मोबाइल खेचून पळणाऱ्या चोरट्याला विरोध करणाऱ्या महिलेला, कळवा स्थानकात लोकलखाली आल्याने जीव गमवावा लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विद्या ज्ञानेश्वर पाटील (वय ३५) या शनिवारी संध्याकाळी अंधेरीहून लोकलने घरी परतत होत्या. लोकल ८ वाजण्याच्या सुमारास कळवा स्थानकात पोचली, तेव्हा लोकलच्या महिला डब्यातून केवळ पाच महिला प्रवासी प्रवास करीत होत्या. कळवा स्थानकातून लोकल मार्गस्थ होताच, एका चोरट्याने महिलांच्या डब्यात प्रवेश करीत उभ्याने प्रवास करीत असलेल्या विद्या यांच्या हातातील मोबाइल खेचून पळ काढला. त्याबरोबर विद्या यांनी देखील चालत्या लोकलमधून उडी मारून चोरट्याची बखोटी धरली. मात्र, या चोरट्याने त्यांना जोराचा हिसका दिल्याने झालेल्या झटापटीत त्या लोकलखाली फेकल्या गेल्या. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती इतर प्रवासी महिलांनी रेल्वे पोलिसांना दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून नंतर नातेवाइकांच्या हवाली केला. याप्रकरणी अज्ञात गर्दुल्ल्यांना मात्र स्थानकात सहज प्रवेश कसा काय मिळतो, असा प्रश्न उपस्थित होत आहे. लॉकडाउनमध्येही रेल्वे पुलांवर गर्दुल्ल्यांचा वावर कसा काय असू शकतो? रेल्वे पोलिसांकडून त्यांच्या बाबतीत बघ्याची भूमिका



चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला असून, आरोपीचा शोध सुरू केला आहे.

मात्र, या घटनेनंतर रेल्वे पोलिसांच्या कामगिरीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकीकडे सर्वसामान्य प्रवाशांना रेल्वे स्थानकांत प्रवेश दिला जात नसताना चोरटे, पाकिटमार, का घेतली जाते? चोरटे, सोनसाखळीचोर यांना पोलिसांकडून जाणीवपूर्वक अभय देत त्यांना असे गुन्हे करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते का? नियम केवळ सर्वसामान्य गरिबांसाठीच आहेत का? असे अनेक सवाल प्रवासी संघटनांनी उपस्थित केले आहेत.

# संतापजनक! पोटच्या मुलीवर अत्याचार करुन विष पाजले, नराधम बापाला अटक

**पोटच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करुन तिला विष पाजणाऱ्या नराधम बापाला बुलडाणा पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्यावर पोक्सो व अन्य कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलाय.**

बुलडाणा: पोटच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून नराधम बापाने पीडित मुलीला विष पाजल्याची संतापजनक घटना बुलडाण्यात घडली आहे. या प्रकरणी नराधम पित्याविरुद्ध रायपूर पोलिसांत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. रायपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत २७ मे च्या संध्याकाळी ही भयंकर घटना घडली. १६ वर्षांची मुलगी एकटी घरी असताना ४१ वर्षीय बापाने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. घडलेली घटना कोणाला सांगितली तर ठार मारण्याची धमकी देऊन तिला मारहाणही केली. इतक्यावरच न थांबता या नराधमानं अत्याचाराचा प्रतिकार करणाऱ्या मुलीला विषारी औषध पाजले. पीडित मुलीला उपचारासाठी बुलडाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या घटनेची माहिती मिळताच रायपूर पोलीस बुलडाणा सामान्य रुग्णालयात पोहोचले व पीडितेचा जबाब नोंदविला. या प्रकरणी रायपूर पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात बलात्कार, पोक्सो व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला काल रात्री अटक करण्यात आली आहे. आरोपीला आज बुलडाणा न्यायालयात हजर केले गेले. त्यावेळी न्यायालयानं पुढील दोन दिवसासाठी त्याची रवानगी पोलीस कोठडीत केली आहे.






हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898